VOL- XI ISSUE- III MARCH 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# महात्मा जोतीराव फुले लिखित साहित्याचा सामाजिक उत्थानामध्ये योगदान : एक अभ्यास

**सौ.प्रज्ञा अरविंद भगत**
ग्रंथपाल, भवभूती महाविद्यालय,
आमगाव , जि.गोंदिया

**सारांश:-**

*प्रस्तुत लेखामध्ये महात्मा ज्योतीराव फुले यांचे शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक योगदान बरोबरच स्वलिखित साहित्याचा तत्कालीन सामाजिक व्यवस्था व परंपरा यांच्यावर झालेला परिणाम व त्यामुळे झालेला बदल याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. साहित्य हा समाजाचा आरसा असतो पण, त्या आरशामध्ये शोषित घटकाला बघण्याची पात्रता, बळ, विश्वास निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी केले. तत्कालीन परिस्थिती मध्ये साहित्य निर्मिती व अध्ययन फक्त सनातन लोकांची मक्तेदारी होती. साहित्याचे वाचन विवेचन, अवलोकन करणे हे सामान्य माणसाच्या आवाक्यात नव्हते. महात्मा ज्योतिराव फुले यांचे शैक्षणिक कार्याचे मूल्यमापन करताना काही महत्त्वपूर्ण बाबींकडे लक्ष वेधावे लागते. अत्यंत विपरीत आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी केलेली कामगिरी ही नेत्रदिपक अशीच होती.*

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत लेखामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या साहित्याच्या बळावर समाजामध्ये जो आमुलाग्र बदल घडवून आणला, क्रांती घडवून आणली यांचे विश्लेषण करण्यात प्रयत्न केलेला आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्माआधीची पार्श्वभूमी बघता असे लक्ष्यात येते की, सामान्य व्यक्ती समता ,बंधुता , न्याय या त्रिसूत्री पासून कोसो दूर होता .केवळ आपली पोटाची भूक शमवणे , आपले अंग झाकणे हे एकमेव ध्येयं समोर ठेउन सामान्य जनता आपले जीवन जगत होती . अश्या वेळी महात्मा फुले या सारख्या गोर गरिबांचा कैवारी यांचा जन्म ११ एप्रिल 1827 मध्ये झाला. तत्कालीन सामाजिक परिस्थिती ही त्यांच्यासाठी प्रतिकूलच होती , पण प्रत्येक परिस्थितीमध्ये समाजाचा उत्थान करण्याचा ध्यास मनी होता व त्याकरिता त्यांना अपार कष्ट सोसावे लागले. महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म जेव्हा झाला त्यावेळेस नुकताच पेशवाईचा अंत होऊन नुकतेच इंग्रजांनी आपले आपले बंगालतर्फे आपले पाय महाराष्ट्र मध्ये रोवले होते. बंगाल प्रदेश आपल्या अधिपत्यामध्ये आल्यानंतर योजने नुसार इंग्रजांनी संपूर्ण देशामध्ये आपल्या साम्राज्याची मुहूर्त मेढ रोवण्यास होण्याची सुरुवात केली होती. सुरुवात म्हणून महाराष्ट्र मध्ये ही इंग्रजांनी पेशवाईचा अंत करून आपले साम्राज्य येथे उभारले होते. त्याकरता, त्यांनी काही शाळा स्थापन करून लोकांना शिक्षण देण्यास सुरू केले. कारभारा करीता मनुष्बळ हा एकमेव उद्देश त्यामागे होता. आधीच पेशवाई ने लोकांचे शोषण केल्याने दिन दलित लोक ग्रस्त झाले होते. तर, मग पेशवाईपेक्षा आताचे साम्राज्य बरे, असे जनमाणसात भावना निर्माण झाली होती. इंग्रजांनी निदान शोषित घटकासाठी शिक्षणाची दारे उघडे केली होती, याचाच फायदा महात्मा ज्योतिराव फुले यांनी घेतला व जोपर्यंत जनसामान्यांना आपल्या हक्काची जाणीव होणार नाही तोपर्यंत समाज जागृत होणार नाही हे त्यांना ठाऊक होते. महात्मा फुले यांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत असताना अनेक संकटांचा सामना करावा लागला त्यांचेच काही मित्र जे इतर जातीचे होते त्यामध्ये यांनी त्यांना पुढील वाटचाली करता मदत केलेली आहे. मात्र, महात्मा फुले यांच्या एक गोष्ट लक्षात आली की, जोपर्यंत शूद्र व इतर जातीतील लोक शिक्षण घेणार नाही तोपर्यंत विकास त्यांच्यापर्यंत पोहोचणार नाही म्हणून त्यांनी शिक्षण संस्था सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली. या सर्व सामाजिक चळवळीमध्ये त्यांच्यावर थॉमस पेन या अमेरिकेन विचारवंत याच्या विचाराचा खूप मोठा प्रभाव होता. थॉमस पेन हा एक मोठा अमेरिकन विचारवंत होता. अमेरिका देश निर्माण करण्यामध्ये त्याचा सिंहाचा वाटा होता.थॉमस पेन हा बंडखोर

VOL- XI ISSUE- III MARCH 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

अमेरिकेन विचारवंत होता. ब्रिटन पासून अमेरिका निर्माण होणे यामध्ये त्यांच्या विचाराचा सिंहाचा वाटा होता.

थॉमस पेन यांचे विचार हे वैज्ञानिक दृष्टिकोन असे संबंधित होते . थॉमस पेन लिखित Rights of Man या ग्रंथाचा महात्मा फुले यांच्या जीवनावर खूप मोठा परिणाम दिसून येतो. मानव अधिकार व मानवी मूल्य समाजातील प्रत्येक घटकाला समान मिळायला पाहिजे त्यामध्ये त्यांच्यावर कोणते अन्याय होऊ नये ही विचारसरणी महात्मा फुले यांची होती.समाजातील ते घटक हा समाजाचा अंग असतो, त्याच्याशी निगडित मानवी मूल्य मानव अधिकार यांचे पतन होऊ नये याच्याशी महात्मा फुले यांचा संघर्ष होता.

**महात्मा फुले- साहित्यिक योगदान** :- जे न पाहे रवी ते पाहे कवी असे आपण नेहमीच ऐकतो, वाचतो हे खरच सत्य आहे का यांची मीमांसा का करावी याचे ज्ञान त्यांनी सामान्य जनतेला दिले. महात्मा फुलेचे साहित्य हे समाजाचा आरसा आहे , समाजामध्ये असलेला असंतोष , अशांतता, उच्च —नीच , वर्णभेद ,स्त्री-पुरुष असा भेदभाव त्यांनी आपल्या काव्याच्या रूपाने मांडला आहे. प्रस्तुत लेखामध्ये महात्मा फुले लिखित साहित्य यामध्ये तृतीयरत्न ,गुलामगिरी ,ब्राह्मणाचे कसब, छत्रपती शिवाजी महाराज याचा पोवाडा, शेतकर्याचा आसूड समावेश आहे .

तृतीयरत्न-. १८५५ मध्ये तृतीय रत्न या नाटकाची त्यांनी निर्मिती केली व त्यासाठी सहयोग राशि प्राप्त व्हावी याकरिता देणगी प्रयाग कमिटीकडे अर्ज दाखल केला असता त्या नाटकातील गाभा त्यांनी वाचला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की संपूर्ण नाटक ब्राह्मणी कपटे राजकारण याच्याविरुद्ध आहे त्याचबरोबर या नाटकामध्ये इंग्रज चे धोरण यावरही बाण कसला आहे तेव्हा त्यांनी ते नाटक प्रकाशित करण्यात किंवा त्याला सहकार्य करण्यात स्पष्ट नकार दिला. या नाटका मध्ये एक कुणबी कुटुंब व त्यावर ब्राह्मणी विचार कसे कुर घोडी करतात यांचे ज्वलंत उदाहरण आहे. यामध्ये जोगाई ही महिला व तिचा पती याच्यातील संभाषण प्रस्तुत केली आहे. कशा प्रकारे हे ब्राह्मण जोशी त्यांना ग्रहाचे व इतर वाईट परंपरा ची भीती दाखवून त्यांच्याकडून पैसा उठण्याचा प्रयत्न करतो पण त्यांना महात्मा फुले यांनी एक विदूषक पात्रही निर्माण केले आहे ते पात्र त्यांना सत्याची जाणीव करून देते व शेवटी ते पात्र महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या प्रौढ शिक्षण वर्गामध्ये आपली नोंद करून शिक्षणाचा श्री गणेशा करतात. या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी ब्राह्मणी कपटी कारस्थान याच्यावर टीका केली आहे त्याचबरोबर जर समाज शिकला तर तो पुढे इंग्रजांशी संघर्ष करेल असं त्यांना वाटते या पुस्तकामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने लक्ष्यात येते की, प्रौढशिक्षणाची मुहूर्तमेढ महात्मा फुले यांनीच समाजामध्ये रोवली आहे व आजच्या काळामध्ये प्रौढ शिक्षण हे आधुनिक रूप आहे.

ब्राह्मणाचे कसब -१८६९ मध्ये इंदुप्रकाश छापखान्यात छापून प्रकाशित करण्यात आले आहे. तत्कालीन परिस्थिती इतकी भयानक होती की पती-पत्नी चे चारचौघात एकमेकाशी बोलणे ही निश्चित व समाजाला धरून मानले जात नव्हते त्याकाळी महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षित करून एक नवा पायंडा घातला . ब्राह्मणाचे कसब हे ग्रंथ महात्मा फुले यांनी कुणबी, माळी, मांग, महार यास अर्पण केले आहे ज्योतिबांनी ब्राह्मणाच्या कसबाचे यथार्थ वर्णन केले आहे . या ग्रंथामध्ये परशुराम व ब्राह्मण जोशी शुद्राच्या घरी मूल जन्मले म्हणजे कसा त्यांच्याकडून पैसा उकडतो व अंधश्रद्धा त्यांच्या माथी मारतो याचे विश्लेषण या ग्रंथामध्ये केले गेले आहे. या पुस्तकांमध्ये विविध अभंग ज्यामध्ये शुद्राच्या घरी लग्न असले, घराची वास्तुशांती असली की कसे आर्थिक शोषण करतो याचे पद्य स्वरुपात वर्णन केले आहे जेव्हा ब्राह्मण शूद्राच्या घरी पोती वाचायच्या निमित्ताने त्यांच्या परिवारामध्ये कसे आपले विचार त्यांच्या विचारांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करतो याविषयी पोवाडा ही कथन केला गेला आहे. एका पोवाड्यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले म्हणतात ..

*बामणी कावा ll*<br>*समजून घ्यावाll*<br>*आहेत आकलेचे खबरदारll.*<br>*शहाणे ठक आर पार ll*

शूद्र जेव्हा आपल्या आयुष्याची अंतिम घटका मोजत असताना सुद्धा ब्राह्मण त्यांचे कसे शोषण करतो याचे विश्लेषणही त्यांनी पोवाडा च्या माध्यमातून केलेले आहे.

गुलामगिरी या पुस्तकाची प्रथम आवृत्ती १८७३ सालि प्रकाशित झाली त्यानंतर २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. गुलामगिरी या पुस्तकाच्या माध्यमातून महात्मा ज्योतिराव फुले यांनी शेकडो

वर्ष शुद्र ती अतिशूद्र लोकांचे ब्राह्मण राज्य आल्यापासून सतत दुःख व अन्याय सहन करीत आहेत. या पासून त्यांची सुटका व्हावी त्यांना तत्कालीन परिस्थिती जाणीव व्हावी याकरिता या पुस्तकाचे लेखन महात्मा ज्योतिराव फुले यांनी केले आहे. प्रस्तुत पुस्तकामध्ये ज्योतिराव आणि धोंडीबा यांच्या मधला संवाद यामध्ये दर्शविला आहे. यामध्ये धोंडीबा प्रश्न उपस्थित करतो व ज्योतिबा या त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो. शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकामध्ये अक्षरशः शेतकऱ्यास बट ब्राह्मण कसे प्रकारे धर्मांध करून त्यांचे शोषण करतात यांचे संपूर्ण विश्लेषण या ग्रंथामध्ये दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज राजे भोसले यांचा पोवाडा - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी महात्मा ज्योतिराव फुले यांना फार अभिमान असून राजांच्या कर्तृत्वावर नितांत श्रद्धा होती. १८६८ मध्ये ज्योतिबांनी रायगडाकडे जाऊन शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध लावला आणि १८६९ साली शिवाजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा पोवाडा त्यांनी रचला व तो प्रसिद्ध केला. हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर रचित महाराष्ट्रतील पहिला पोवाडा आहे .

शेतकऱ्याचा आसूड -१८ जुलै १८८३ मध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचा आसूड चे लेखन करून प्रकाशित केलेले आहे . स्वतः ते शेतकरी कुटुंबात जन्म झाल्याने शेतकऱ्याच्या तत्कालीन स्थिती, परिस्थिती यांचे सखोलज्ञान त्यांना होते . शेती करताना कुठल्या समस्येला तोंड द्यावे लागते, परिस्थितीशी किती संघर्ष करावा लागतो याची जाणीव त्यांना असल्यामुळे त्यांचे अनुभवातूनच शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथाचा जन्म झालेला आहे. त्या कालखंडामध्ये भारतात ब्रिटिश सत्ता होती. शेतकऱ्याचे शोषण सत्तेबरोबर च सावकार, जमीनदार यांचे कडून सुद्धा केले जात होते . नैसर्गिक आपदा, दुष्काळ त्याबरोबर प्लेग यासारख्या रोग , समस्या समाजासमोर आ वासून उभ्या होत्या. या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे तीन वर्गामध्ये वर्गीकरण केले आहे जसे, कुणबी, माळी व धनगर आणि हे तीनही वर्ग एकाच वर्गातून निर्माण झालेले आहे. पुढील व्यवसायानुसार जाती निर्माण झाले आहे. या ग्रंथामध्ये महात्मा फुले लिहितात की शेतकऱ्याच्या तत्कालीन स्थितीला, परिस्थितीला त्याचे सर्व अंगाकडून होणारे शोषण कारणीभूत आहे. समाजामध्ये असलेली निरक्षरता, अज्ञान, कर्जाचा डोंगर यासारखी कारणे त्यांच्या शोषणाला कारणीभूत आहे असे या ग्रंथात सांगितले आहे. या ग्रंथामध्ये जशा समस्या सांगितलेल्या आहे त्याचबरोबर त्यांच्यावर उपाययोजना ही महात्मा फुले यांनी सुचविलल्या आहे. शेतीचे उत्पादन , सुपीकता वाढविणे त्याकरिता सेंद्रिय खते शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावेत , शेती विषयक योजनेचा अभ्यास करून नवीन सुधारणा घडवून आणाव्यात अशी ही त्यांनी सुचविले आहे. या लेखांमध्ये महात्मा फुले यांनी निर्मित साहित्य साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन , हक्काची जाणीव करून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे .

साहित्याच्या माध्यमातून लोक जागृती व्हावी, जनजागृती व्हावी समाजाला आपल्या हक्काची जाणीव व्हावी हा मुख्य उद्देश महात्मा फुले यांच्या साहित्यातून दिसून येते. प्रस्तुत लेखा मध्ये महात्मा फुले स्वलिखित साहित्य मध्ये तृतीय रत्न, गुलामगिरी, शेतकऱ्याचा आसूड, ब्राह्मणाचे कसब, पेशवा महाराजांचा पवाडा याचा प्रामुख्याने समावेश केले गेला आहे. मनुष्य जेव्हा समाजात जगतो समाजातील चालीरीती, रूढी परंपरा याच्याशी त्याचा संबंध येतो किंवा तो विचार करतो त्या चालीरीतील पुढील परंपरा सामान्य माणसाचे शोषण तर करत नाही मग तो त्या चालीरीती रूढी परंपरा त्यांच्याशी दोन हात करायला पुढे येतो या लेखांमध्ये महात्मा फुले यांनी रूढी परंपरा चालीरीती यांच्या विरुद्ध संघर्ष व तो संघर्ष करताना त्यांना सहन केलेला त्रास, समाजाकडून त्यांना वाळीतही टाकण्यात आले. मात्र हे सर्व सहन करत असताना व सर्व गोष्टीचा सहन करून ते कधीही त्या गोष्टीपासून मागे टाकले नाही. १८४८ मध्ये जेव्हा त्यांनी शैक्षणिक संघर्षामध्ये उडी घेतली मुलीसाठी साठी शाळा निर्माण केली व त्या शाळेमध्ये स्वतः व आपल्या पत्नीला शिक्षिका म्हणून त्यांनी कार्य पार पडायला उभे केले . ते कार्य पार पडत असताना त्यांची जवळचे मित्र यांचे पासून दूर गेले कारण त्या शाळेमध्ये ते विद्यार्थ्यांना तुम्ही या स्थितीमध्ये का आहात याचे कारण काय यांचा इतिहास समजावून देत होते , असे असताना त्यांचे मित्रही दुखावल्या गेले व ते दूर गेले. तरी ते मातात्मा ज्योतिराव मागे परत आले नाही .

**निष्कर्ष :-**

महात्मा फुले यांनी शिक्षणतज्ञ, कृषीतज्ञ, अर्थतज्ञ, निबंधकार, शिवचरित्रकार, प्रकाशक म्हणून त्यांनी भारतीय समाजावर आपली छाप टाकली आहे. तत्कालीन परिस्थिती इतकी भयानक होती की पती-पत्नी चारचौघात एकमेकाशी बोलणे ही निश्चित व समाजाला धरून मानले जात नव्हते त्याकाळी महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षित करून एक नवा पायंडा त्याकडे घातला . त्याकाळी त्यांना साहित्याचा कोणताही वारसा लाभला नव्हता पण समजा मधील परिस्थिती पाहून प्रबोधनासाठी साहित्य निर्मिती केली. महात्मा जोतीबा फुले यांच्या साहित्य लिखाणास सुरुवात केली. तेव्हा सावित्रीबाई फुले यांचे लाभलेले पाठबळ हे त्यांच्या साहित्याच्या यशाचे गमक होते. काव्य बरोबरच त्यांनी महात्मा फुले यांना लिहलीली पत्रे हि सुद्धा मानव जातीस विचार करण्यास लावतात.

**संधर्भ सूची**

१.हरी नरके (२०२१) महात्मा फुले समग्र वाघमय. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

२.मोरे ,सदानंद (२०१९) महात्मा फुले यांचे वैचारिक चरित्र ,सकाळ प्रकाशन ,पुणे .

३.साळुंखे ,आ.ह .(१९९२) महात्मा फुले आणि धर्म ,लोक वाडमय गृह ,मुंबई

४.गायकवाड रमिला(२०१८ ) महात्मा फुले यांच्या धार्मिक सुधारणा , भारतीय इतिहास आणि संस्कृती त्रैमासिक, इतिहास संशोधन मंडळ ,मुंबई .

५.श्री माळी वैभव दिवाळी विशेषांक २०२३.